MHAU030149112026 किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१९९७/२०२६

अनीस युसुफ शेख विरुध्द महाराष्ट्र सरकार

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१९९७/२०२६ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश**

१. अर्जदार अनिस युसुफ शेख यांचे मालकीचे वाहन करमाड पोलीस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर, यांनी गुन्हा रजिस्टर क्र.२८३/२०२६ मध्ये, महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १२२ प्रमाणे दाखल गुन्ह्यात जप्त केलेले आहे. सदरील जप्त केलेले मॅक्सीमा कारगो, तीन चाकी लोडींग रिक्षा वाहन ज्याचा नोंदणीकृत क्रमांक MH-20, HQ-0802, चेसीस क्रमांक MD2C17AXXTWA11195 व इंजीन क्रमांक BBXWTA98268 हे अर्जदाराने त्याला वाहन परत मिळण्यासाठी सदरचा अर्ज प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराच्या कथनानुसार अर्जदार याचे मालकीची सदरचे वर नमुद वाहन हे करमाड पोलीस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर, गुन्हा रजिस्टर क्र.२८३/२०२६ चे कामी जप्त केलेले आहेत. सदर वाहनाचा वापर अर्जदार हे रोजच्या दैनंदीन कामासाठी करत असुन त्यावर त्याची उपजीवीका चालते व ते त्याचे कमाईचे साधन आहे. सदर वाहन तसेच जप्त राहिल्यास पोलीस स्टेशन करमाड, छत्रपती संभाजीनगर, येथे वाहन ठेवण्यासाठी शेड नसल्याने सध्या पावसाळी दिवस असल्याकारणाने गाडीचे किंमती पार्ट खराब होवून ती नादुरुस्त होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्जदाराचे बरेच नुकसान होणार आहे. सदर अर्जदार सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. म्हणून अर्जदाराने वर नमुद जप्त केलेले वाहन त्याला देण्याची विनंती केलेली आहे.

३. तपासी अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे सादर करुन हरकत घेतली आहे. त्यांनी कथन केले की, सदर वाहन हे गंभीर स्वरुपाच्या चोरीच्या गुन्हयातील जप्त केलेले वाहन आजहे. सदर वाहन अर्जदाराला परत केल्यास तो पुन्हा अशाच स्वरुपाच्या गुन्हयात सदर वाहनाचा वापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वाहनाच्या मालकाने अद्यापपर्यंत वाहानाच्या मालकीबाबत कागदपत्र दाखल केलेले नाहीत. सदर गुन्हयाचा तपास सुरु असुन सदरील वाहन अर्जदाराला परत केल्यास अर्जदार हे सदरील वाहन पुन्हा

विक्री करेल किंवा त्यात बदल करुन गुन्हयातील पुरावा नष्ट करु शकतो. तसेच अर्जदाराला सदरील वाहन पोलीस व न्यायालय हे हजर करण्यास सांगतील त्यावेळी अर्जदार सदर वाहन हजर करणार नाही. त्यामुळे अर्जदाराला सदरील वाहन हे अर्जदाराला परत करण्यात येवु नये, अशी विनंती तपासी अंमलदार यांनी केली आहे व शेवटी अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी विंनती केली.

४. सरकारी वकीलांनी त्यांचे म्हणणे सादर केले आहे व त्यात त्यांनी असे कथन केले की, अर्जदार हा आरोपी आहे. वाहनाच्या मुळ मालकाबाबत अर्जदाराने अद्यापपर्यंत सक्षम असे कुठलेही कागदपत्र दाखल करुन सिध्द केलेले नाही. सदर वाहन अर्जदाराला परत केल्यास त्याचा गैरवापर होऊ शकतो. म्हणुन सदरील अर्ज नामंजुर करण्याबाबत सरकारी वकीलांनी विनंती केली आहे.

५. अर्जदाराने सदर अर्जासोबत वाहनाची विशेष माहीती, वाहनाची पावती, वाहनाचा भरलेला विमा व प्रथम खबर अहवालाची प्रत इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तसेच अर्जदाराने त्याचे वाहन चालवण्याच्या परवान्याची प्रत देखील दाखल केली आहे. दाखल कागदपत्रावरुन जप्त वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे दिसून येते.

६. *सुंदराभाई अंबालाल देसाई वि. गुजरात राज्य (ए.आय.आर.२००३ एससी ६३८)* यामध्ये ना. उच्च न्यायालय यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम–४५१ नुसारचे अधिकार हे अर्ज लवकरात लवकर निकाल करण्यासाठी व जप्त माल हा जास्त कालावधीसाठी पोलीस ठाण्यात ठेवण्यात येवू नये यासाठी आहेत, असे नमूद केलेले आहे. अर्जदार यांनी व्यक्त केलेल्या साशंकता की, सदर वाहन तसेच जप्तीत राहिल्यास पोलीस स्टेशन करमाड, छत्रपती संभाजीनगर येथे वाहन ठेवण्यासाठी शेड नसल्याने पावसाळी दिवस असल्याने वाहनाचे किंमती पार्ट खराब होवून ती नादुरुस्त होण्याची शक्यता आहे. या बाबी संयुक्तीक वाटतात. अर्जदार सदर वाहनाचा वापर उपजिवेकेसाठी करतात. त्यामुळे ते वाहने तसेच पोलीस स्टेशनला पडून राहिल्यास त्याची उपयुक्ततेवर परिणाम होईल व अर्जदाराची देखील गैरसोय होईल. आजकाल वाहने सामान्य माणसांना दैनंदिन कामात लागणारी वस्तू आहे, ही बाब सर्वश्रृत आहे.

७. प्रस्तुत प्रकरण नुकतेच दाखल झाले असुन ते चालवुन त्यांचा निकाल लागण्यास वेळ लागणार आहे. अर्जदार सदर प्रकरणात आरोपी नाही. इतर कोणी आज पर्यंत हजर होवुन वाहनाची मागणी केली नाही. सदर वाहन हे अर्जदाराच्या उपजिवीकेचे

साधन आहे. त्यामुळे ते पो.स्टे.मध्ये ठेवणे योग्य होणार नाही. सरकारी वकील यांचे म्हणणे विचारात घेता अर्जदार यांचेवर काही अटी व शर्ती घालून सदरील वाहन परत देणे न्यायोचित होईल. सबब वरील बाबींचा विचार करता खालील आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन करमाड, छत्रपती संभाजीनगर यांना आदेश देण्यात येतो की, गुन्हा रजिस्टर क्र.२८३/२०२६ मध्ये जप्त केलेले मॅक्सीमा कारगो, तीन चाकी लोडींग रिक्षा वाहन ज्याचा नोंदणीकृत क्रमांक MH-20, HQ-0802, चेसीस क्रमांक MD2C17AXXTWA11195 व इंजीन क्रमांक BBXWTA98268 हे अर्जदार याच्या ताब्यात रक्कम रु.५,००,०००/– (रक्कम रुपये पाच लाख मात्र) चे हमीपत्र दिल्यानंतर देण्यात यावी.

२. अर्जदाराने सदर वाहनामध्ये प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्रयस्थ इसमाचा हक्क किंवा अधिकार निर्माण करु नये व अन्य कुठल्याही प्रकारे त्याची विल्हेवाट लावू नये. तसेच अर्जदाराने सदरील वाहन हे इतर गुन्हयात वापरु नयेत.

३. अर्जदाराने प्रकरणाच्या चौकशीसाठी जेंव्हा जेंव्हा सदर वाहनाची आवश्यकता असेल तेंव्हा तेंव्हा ते वाहन हजर करावे. वरील वाहन परत करतांना तपासिक अधिकारी यांनी त्यांचा सविस्तर पंचनामा करावा.

४. अर्जदाराने वरील वाहनाच्या चारही बाजुने छायाचित्र काढून वरील वाहन त्याच्या ताब्यात मिळाल्यानंतर आठ दिवसांच्या आत सदर प्रकरणी दाखल करावीत.

Digitally signed by PANHALE SWATI HANMANTRAO
Date: 2026.07.02 18:02:39 +0530

दिनांकः– ०२/०७/२०२६

(एस. एच. पन्हाळे)
५ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
औरंगाबाद.